**बदलापूर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील शाळेतील अल्पवयीन पीडित विद्यार्थिनीच्या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश शुल्काचा खर्च एक वेळची विशेष बाब म्हणून बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अंतर्गत अदा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१५८/एस.डी.१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १४ मे, २०२६

**वाचा :-**

शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. आरटीई २५% /८०१/२०२६/१८९०३६६, दिनांक ११ मे, २०२६.

**प्रस्तावना :-**

बदलापूर, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथे माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये एका शाळेतील दोन अल्पवयीन मुलींवर अनुचित घटना घडल्याचे निदर्शनास आले होते. समाजाच्या सर्व स्तरातून या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला होता. पीडित मुलींच्या (निर्भया क्र. १ व २) इयत्ता १ ली ते १० पर्यंतचे शैक्षणिक प्रवेशाबाबत लागणारा खर्च शासनस्तरावरून करण्यात येणार असल्याची घोषणा तत्कालीन मा. मंत्री, शालेय शिक्षण यांनी केली होती.

मुलींच्या पालकांच्या इच्छेनुसार संबंधित शाळांमध्ये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात निर्भया क्र. १ व निर्भया क्र. २ चा प्रवेश शाळेत ज्युनिअर के. जी. मध्ये झालेला आहे. सद्यस्थितीमध्ये निर्भया क्र. १ व निर्भया क्र. २ या दोघी इयत्ता १ ली मध्ये प्रवेशित आहेत.

तत्का. मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे आश्वासन विचारात घेऊन, निर्भया क्र. १ व २ यांचा इयत्ता १० वी पर्यंतचा शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश शुल्काचा खर्च, एक वेळची विशेष बाब म्हणून, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अंतर्गत अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

निर्भया क्र. १ चे इयत्ता १ ली ते इयत्ता १० पर्यंतचे व निर्भया क्र. २ चे प्रलंबित सिनिअर के. जी. व इयत्ता १ ली ते १० पर्यंतचे शैक्षणिक वर्षांचे प्रवेश शुल्क हे बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अंतर्गत शासनामार्फत अदा करण्यास, एक वेळची विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

२.	निर्भया क्र. १ व निर्भया क्र. २ प्रवेशित असलेल्या संबंधित शाळांना त्यांनी विहित केलेल्या रकमेइतकी शैक्षणिक वर्षाची प्रवेश शुल्काची रक्कम त्या-त्या शैक्षणिक वर्षामध्ये बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अंतर्गत अदा करण्यात यावी.

३.	निर्भया क्र. १ व निर्भया क्र. २ प्रवेशित असलेल्या शाळांना विहित मुदतीत शैक्षणिक वर्षाची प्रवेश शुल्काची रक्कम बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अंतर्गत अदा करण्याची कार्यवाही संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद हे करतील. यासंदर्भातील प्रस्ताव ते शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सादर करतील व शिक्षण संचालक (प्राथमिक) हे प्रस्तावास मान्यता देऊन, संबंधित शाळांना शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांच्यामार्फत शुल्क अदा करण्याची कार्यवाही करतील.

४.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०५१४१५४४१६४७२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TUSHAR VASANT
MAHAJAN

Digitally signed by TUSHAR VASANT MAHAJAN
DN: c=IN, o=Personal, title=9656,
2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118634069a6cc7a22b9f, postalCode=400089, st=Maharashtra,
serialNumber=1a39cef3c157b9ee6a2abe5779acf233682613f7b9c335d6bf4877267695ceca, cn=TUSHAR VASANT MAHAJAN
Date: 2026.05.14 15:45:09 +05'30'

**(तुषार महाजन)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व क्रीडा आणि युवक कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र, मुंबई.
६. मा. अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र, मुंबई.
७. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानमंडळ, मुंबई.
८. मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व मा. विधानपरिषद/विधानसभा सदस्य, विधानमंडळ, मुंबई.
१२. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव (शालेय शिक्षण), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५. विभागीय आयुक्त (सर्व ).
१६. जिल्हाधिकारी (सर्व).
१७. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).

१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२०. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
२१. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
२२. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यास संशोधन मंडळ, बालभारती, पुणे
२३. शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
२६. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक).
२७. निवडनस्ती (एस.डी.१).